# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २२.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २१/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३१३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,३१,१००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२१/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ७८.७६ लिटर दारू असा एकुण १९,०३०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—**दिनांक २१/११/२०२२ रोजी फिर्यादी ज्ञानबा संभाजी कऱ्हाळे वय ५५ वर्ष व्य.शेती रा.डिग्रस कऱ्हाळे ता.जि.हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोंली ग्रामीण येथे कलम ४५७,३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन कोणीतरी अज्ञात चोराने यातील फिर्यादी व इतर साक्षीदार यांची मौजे डिग्रस कऱ्हाळे येथील घराचे खिडकीची जाळी व कडी कोडा काढुन खिडकीतुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी संदुक उचलुन घेवुन जावुन संदकातील सोन्या चांदीचे दागीने असा एकुण १,६९,२०० रू मुद्देमाल कोणी तरी अज्ञात चोरटयानी चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस तपास करित आहेत.

**अपघात :—**दिनांक २१/११/२०२२ रोजी कलम कलम २७९,३३७,३३८ भादवी अन्वये पोस्टे आ.बाळापुर येथे ०१ गुन्हा दाखल असुन पुढील तपास आ.बाळापुर पोलीस करित आहेत.